पुणे महानगरपालिका

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id: mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/ ४०७
दिनांक १७/०४/२०२१

# आदेश

विषय:- कोरोना विषाणू (कोविड - १९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी " Break The Chain " प्रतिबंधात्मक आदेश.

संदर्भ:-
१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७
४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २३ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर२०२०, १४ नोव्हेंबर२०२०,२३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर२०२०, १४ जानेवारी २०२१, , १० फेब्रुवारी २०२१, १५ मार्च २०२१,१७ मार्च २०२१, २७ मार्च २०२१, ४ एप्रिल २०२१,१३ एप्रिल २०२१
५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०,२९३४,दि.०३.०८.२०२०, ३७९१,दि.०२.०९.२०२०, ४६१५,दि.०१.१०.२०२०, ४८२३,दि.०९.१०.२०२०, ४८७४,दि.१३.१०.२०२०, ५१३५,दि.२१.१०.२०२०, ५१९६,दि.२४.१०.२०२०, ५३४२,दि.२९.१०.२०२०, ५३४५,दि.३१.१०.२०२०, ५४६७,दि.०५.११.२०२०, ५६४३,दि.१९.११.२०२०, ५९४७,दि.०१.१२.२०२०, ६६०८,दि.२२.१२.२०२०, ६८३८,दि.३१.१२.२०२०, ७१३९,दि.११.०१.२०२१, ७३५५,दि.१६.०१.२०२१, ७४५८,दि.२०.०१.२०२१, ७५४७,दि.२२.०१.२०२१, ७५७४,दि.२२.०१.२०२१, ७७८५,दि.०१.०२.२०२१, ८०२१, दि.०९.०२.२०२१,८२७४,दि.१८.०२.२०२१, ८३०८,दि.२१.०२.२०२१, ८५७७ दि.२८.०२.२०२१, ९०५२,दि.१२.०३.२०२१, ९१४४, दि.१६.०३.२०२१, ९३११, दि.२०.०३.२०२१, ९५३१ दि.२६.०३.२०२१,९५४५, दि.२७.०३.२०२१, ५८, दि.०२.०४.२०२१, ८९ दि. ०५.०४.२०२१, ११३ दि. ०६.०४.२०२१, २४० दि. ०९.०४.२०२१, ३०० दि. १४.०४.२०२१

पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन-१९५० MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF PUNE * EST.1950 *

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोविड – १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) सर्व ऑक्सिजन प्रोड्युसर कंपन्यांनी १००% ऑक्सिजनचा पुरवठा हा फक्त वैद्यकीय कारणासाठी करावा. त्यांनी ऑक्सिजनचा वापर करणारे आणि ऑक्सिजन पुरवठा करणारे यांची यादी प्रसिद्ध करावी.

२) पुणे महानगरपालिका क्षेत्रात मे. महाराष्ट्र शासनाने ज्या अत्यावश्यक सेवेशी संबंधित उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना परवानगी दिलेली आहे अश्या कंपन्यांना आवश्यक मालाचा पुरवठा करणारी दुकाने केवळ त्याच कारणासाठी सुरु ठेवता येतील. त्यांना इतर किरकोळ विक्री करता येणार नाही.त्यांनी Point To Point विक्री करावी.

३) खालील आस्थापनावरील कर्मचा-यांना कोविड – १९ ( RTPCR / RAT/ TruNAT / CBNAAT ) चाचणी करणेपासून सूट देण्यात येत आहे.

- ई-कॉमर्स मार्फत घरपोच सुविधा देणारे कर्मचारी
- हॉटेल,बार,रेस्टॉरंट यांचे कर्मचारी तसेच त्यांचे मार्फत घरपोच सुविधा देणारे कर्मचारी
- खाजगी वाहतूक करणारे वाहन चालक / मालक
- दैनिक वर्तमानपत्रे, नियतकालीन मासिके, साप्ताहिके इ. ची छपाई व वितरण करणारे कर्मचारी
- घरगुती काम करणारे कामगार, वाहन चालक, स्वयंपाकी, जेष्ठ नागरिक आणि घरी आजारी असणाऱ्या लोकांना सेवा देण्यासाठी वैद्यकीय मदतनीस / नर्स
- तथापी त्यांनी भारत सरकारद्वारे निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे.

४) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील खानावळी ( मेस ) या फक्त पार्सल सेवेसाठी सर्व दिवस सकाळी ०७.०० ते सायंकाळी ०८.०० या वेळेत सुरु राहतील.

५) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील मद्य विक्रीची दुकाने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नियमाप्रमाणे होम डिलीव्हरी सुविधा सोमवार ते शुक्रवार सकाळी ०७.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेत सुरु राहतील.

६) चष्म्याची दुकाने सोमवार ते शुक्रवार सकाळी ०७.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.

७) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

८) पुणे महानगरपालिकेने यापूर्वी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि१७.०४.२०२१ पासून पुढील आदेशा पर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि१७.०४.२०२१ रोजी दिलेला आहे.

(विक्रम कुमार) 17/4
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित